RNI No. MAHBIL/2009/35527

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-क

वर्ष ७, अंक ४८] गुरुवार, डिसेंबर २३, २०२१/पौष २, शके १९४३ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ५६**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

### महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

विधान भवन मुंबई, दिनांक २३ डिसेंबर, २०२१

### अधिसूचना

क्रमांक १/ड-९/२०२१.—महाराष्ट्र विधानसभा नियमातील पुढील सुधारणा उक्त नियमातील नियम २२५ च्या पोट-नियम (३) ला अनुसरुन, याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहेत :—

### महाराष्ट्र विधानसभा नियमात सुधारणा

#### नियम ६

१. महाराष्ट्र विधानसभा नियम (यात यापुढे "उक्त नियम") यामधील नियम ६ मध्ये.—

(१) पोट-नियम (१) मध्ये "निवडणूक घेण्यासाठी" हा मजकूर वगळून "मुख्यमंत्री यांच्या शिफारशीवरुन अध्यक्षाची निवड करण्यासाठी" हा मजकूर दाखल करण्यात यावा.

(२) पोट-नियम (२) मध्ये "अशारितीने ठरविलेल्या तारखेच्या अगोदरच्या दिवसाच्या मध्यान्हाच्या पूर्वी कोणत्याही वेळी कोणत्याही सदस्यास," या मजकुरानंतर "निवडणुकीसाठी" या मजकुराऐवजी "अध्यक्षांची निवड करण्यासाठी" हा मजकूर दाखल करण्यात यावा.

(३) पोट-नियम (२) च्या खंड (ब) नंतर पुढील परंतुक दाखल करण्यात यावे :—

"परंतु, सदस्याला स्वत:चे नाव सुचविता येणार नाही अथवा त्याचे नाव सुचविण्यात आलेल्या प्रस्तावाला अनुमोदन देता येणार नाही अथवा एकाहून अधिक प्रस्ताव मांडता येणार नाहीत किंवा त्यांना अनुमोदन देता येणार नाही."

(४) नियम ६ च्या पोट-नियम (३) ऐवजी पुढील पोट-नियम दाखल करण्यात येईल :—

(३) (अ) कामकाज पत्रिकेत प्रस्ताव ज्याच्या नावावर असेल अशा सदस्याचे नाव पुकारण्यात आल्यानंतर, त्याला प्रस्ताव मांडता येईल अथवा मागे घेता येईल. आणि त्यावेळी त्याचे निवेदन तेवढया पुरतेच मर्यादित राहील,

(ब) जे प्रस्ताव मांडले गेले असतील व ज्यांना रीतसर अनुमोदन देण्यात आले असेल, असे प्रस्ताव ज्या क्रमाने मांडण्यात आले असतील त्याप्रमाणे ते एकामागून एक सभागृहापुढे ठेवण्यात येतील व आवश्यक वाटल्यास मत विभाजनाद्वारे त्यावर निर्णय घेतला जाईल. प्रस्तावाच्या मत विभाजनाच्या वेळी सम-समान मते पडल्यास उपाध्यक्ष, विधानसभेने ठरविलेली व्यक्ती किंवा संविधानाच्या अनुच्छेद १८० च्या खंड (१) अन्वये नेमलेल्या व्यक्तीस, निर्णायक मत (Casting Vote) देण्याचा अधिकार असेल.

(क) कोणताही प्रस्ताव संमत करण्यात आल्यास अध्यक्ष पदावर असलेली व्यक्ती, नंतरचे प्रस्ताव पुढे न ठेवता, ज्या प्रस्तावाला संमती देण्यात आली असेल त्यात प्रस्तावित केलेला सदस्य अध्यक्ष म्हणून निवडून आल्याचे जाहीर करील."

(५) नियम ६ चे पोट-नियम (५), (६) व (७) वगळण्यात यावे.

२. उक्त नियमांच्या नियम ७ मध्ये—

(१) "निवडणूक घेणे" या मजकूराऐवजी "निवड करणे" हा मजकूर दाखल करण्यात यावा.

(२) "निवडणूक घेण्यासाठी" या मजकूराऐवजी "निवड करण्यासाठी" हा मजकूर दाखल करण्यात यावा.

(३) "निवडणुकीस" या शब्दाऐवजी "निवडीस" हा शब्द दाखल करण्यात यावा.

**राजेन्द्र भागवत,**

प्रधान सचिव,

महाराष्ट्र विधानसभा.

## MAHARASHTRA LEGISLATURE SECRETARIAT

Vidhan Bhavan, Mumbai, dated the 23rd December, 2021

*NOTIFICATION*

No.1/D-9/2021.—In pursuance of the provisions of sub-rule (3) of rule 225 of the Maharashtra Legislative Assembly Rules, the amendments to the said rules are hereby published :—

*AMENDMENTS TO THE MAHARASHTRA LEGISLATIVE ASSEMBLY RULES*

**Rule 6**

1. In rule 6 of the Maharashtra Legislative Assembly Rules (hereinafter referred to as "the said rules"),—

(1) In sub-rule (1), for words "for the holding of the election" the words " for electing the Speaker on the recommendation of the Chief Minister" shall be substituted.

(2) In sub-rule (2), for the words "for election" coming after the portion "At any time before noon on the day preceding the date so fixed, any member may nominate another member", the words "for electing the Speaker" shall be substituted.

(3) after clause (b) of sub-rule (2), the following proviso shall be inserted :—

"Provided that, a member shall not propose one's own name or second a motion proposing member's own name or propose or second more than one motion.";

(4) For sub-rule (3), the following sub-rule shall be substituted:--

"(3) (a) A member, in whose name a motion stands on the list of business, may move or withdraw the motion when called upon to do so and such statement shall be confined to that effect.

(b) The motions which have been moved and duly seconded shall be put one by one in the order in which they have been moved and decided if necessary, by division. If equal number of votes are casted during division, the Deputy Speaker, a person determined by Legislative Assembly or a person appointed under clause (1) of Article 180 of the Constitution of India, shall have the right to Casting Vote.

(c) If any motion is carried, the person presiding shall, without putting later motions, declare that the member, whose name is proposed in the motion which has been carried, has been elected as the 'Speaker'."

(5) Sub-rules (5), (6) and (7) shall be deleted.

2. In rule 7 of the said rules,—

(1) For the words "election" the words "selection" shall be substituted.

(2) For the words "for the holding of the election" the words "for the selection" shall be substituted.

(3) For the words "such election" the words "such selection" shall be substituted.

RAJENDRA BHAGWAT,

Principal Secretary,

Maharashtra Legislative Assembly.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.EDITOR : DIRECTOR.RUPENDRA DINESH MORE.